# "21 व्या शतकातील भारत-मालदीव राजकीय संबंध"

**डॉ. अनिल रा. कडु,** राज्यशास्त्र विभाग, स्व. पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय वरुड, जिल्हा अमरावती 444906

---

गोषवारा: मालदीवला 1965 मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मालदीवला देश म्हणून मान्यता देणाऱ्या निवडक देशात भारताचाही समावेश होता. याचबरोबर भारताने 1980 या वर्षी मालदीवमध्ये आपले दूतावास स्थापन केले तर मालदीव ने 2004 साली भारतात आपले दूतावास स्थापन केले. जवळचे आणि मैत्रीपूर्ण शेजारी म्हणून भारत आणि मालदीव यांच्यातील जातीय, भाषिक, सांस्कृतिक, धार्मिक, आणि राजनैतिक संपर्क ज्यांची मुळे खूप जुनी आहेत आणि दोन्ही देशांमधील संबंध सौहार्दपूर्ण आणि बहुआयामी आहेत.

**प्रास्ताविक:**

मालदीव हा दक्षिण आशियाच्या हिंदी महासागराच्या अरबी समुद्रा मधील एक द्वीपसमूह आहे. हा देश भारताच्या लक्षद्वीप द्वीपसमूह जवळ मिनिकॉय आणि चागोस द्वीपसमूहादरम्यान 26 बेटांवर उत्तर-दक्षिण वसलेला आहे. ही द्विपे श्रीलंकेच्या नैऋत्येस 750 किलोमीटर आणि भारताच्या नैऋत्येस 600 किलोमीटर आहे. 298 स्क्वेअर किलोमीटर क्षेत्रफळ व चार लाख लोकसंख्या या दोन्ही बाबतीत मालदीव आशियातील सर्वात छोटा देश आहे.

या शोधनिबंधामध्ये आपण भारत आणि मालदीव संबंध 21व्या शतकात कोणत्या वळणावर आहेत, मालदीव चे स्थान दक्षिण आशियात महत्त्वाच्या सागरी मार्गावर असल्यामुळे मालदीवचे सामरिक महत्व तसेच चीनच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे मालदीवमध्ये लोकशाही संस्कृती टिकवण्याचे आव्हान या याबद्दल चर्चा करणार आहोत.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:**

1) मालदीवचे सामरिक तसेच आर्थिक महत्त्व तपासणे.
2) भारत आणि मालदीव राजकीय संबंध अभ्यासणे.
3) भारतीय उपखंडात चीनचा वाढता हस्तक्षेपचा शोध घेणे.
4) नरेंद्र मोदींच्या कार्यकाळात भारत आणि मालदीव संबंध अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंध अध्ययनासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करून त्याचे संकलन करण्यात आले आहे. अध्ययन विषयाशी संबंधित दुय्यम तथ्य संकलित करण्यासाठी प्रकाशित, अप्रकाशित असलेले शोध अध्ययन, संदर्भ ग्रंथे, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, संशोधन पत्रिका इत्यादी दुय्यम स्त्रोताच्या माध्यमातून संकलित करण्यात आलेलेआहे.

**आशय विश्लेषण:**

हिंदी महासागरातील एक प्रवाळद्विपिय प्रजासत्ताक देश. भारताच्या दक्षिणेस असलेला हा देश आशियातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात लहान राष्ट्र आहे. एक लहान दक्षिण आशियाई देश म्हणून मालदीवचे भारताशी संबंध चांगले आहेत. शेजारी देश म्हणून भारताने मालदीवला विकासासाठी व सुरक्षेच्या दृष्टीने आर्थिक मदत केलेली आहे. हिंदी महासागराच्या मध्यभागी असल्यामुळे भारतासाठी मालदीव हे धोरणात्मकरित्या फार महत्त्वाचे आहे. या देशातील बंदरे आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीच्या दृष्टीने सोयीचे आहेत. येथील नौदल हवाई दलाच्या माध्यमातून हिंदी महासागराचा मोठ्या प्रदेशावर टेहळणी नियंत्रण ठेवता येते. त्याचे सामरिक महत्त्व म्हणजे महत्त्वाच्या समुद्री मार्गावर असलेले त्याचे स्थान त्यामुळे भारताच्या संरक्षण विषयक धोरणात मालदीवला महत्त्व आहे. मालदीवच्या स्थापनेपासून भारताचे मालदीव बरोबरील संबंध चांगले आहेत.

**राजकीय संबंध:**

सर्व स्तरांवरील नियमित संपर्कातून द्विपक्षीय संबंध दृढ झाले आहेत. जेव्हा राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले तेव्हापासून भारताच्या जवळपास सर्वच प्रधानमंत्री यांनी मालदीवला भेटी दिल्या आहेत. मालदीव कडून पूर्व राष्ट्रपती मौमून अब्दुल्ला गयूम तसेच पूर्व राष्ट्रपती मोहम्मद नशीद यांनी त्यांच्या राष्ट्रपती असतानाचा कार्यकाळात भारताचा दौरा केला आहे. पूर्व राष्ट्रपती अब्दुल्ला यामीन यांनी एक उच्चस्तरीय शिष्टमंडळासोबत 2014 मध्ये भारत दौऱ्यावर आले होते जी त्यांची पहिली विदेश यात्रा होती त्यांनी मे 2014 मध्ये मोदींच्या शपथग्रहण समारोहात सुद्धा भाग घेतला होता. सन 2009 मध्ये मालदिव सरकारच्या विनंतीवरून भारत सरकारने मालदीवच्या समुद्री व हवाई सुरक्षेची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. तेव्हापासून आजपर्यंत भारतीय तटरक्षकदल मालदीवची समुद्री सुरक्षा व भारतीय हवाईदल हवाई सुरक्षेला मदत

करीत आहेत. दोन देशांच्या संबंधातले आर्थिक घटक हे चीन साठी महत्वाचे असले तरी हिंदी महासागरातील मालदीवचे भौगोलिक स्थान हे त्यांना अधिक फायद्याचे आहे. मालदीव ने चीनच्या 'बेल्ट अंड रोड' ची प्रशंसा केली असून समुद्री रेशीम मार्गाबाबत सामंजस्य करार मंजूर केला आहे. त्यामुळे बीजिंगला असे वाटते आहे की त्यांनी हिंदी महासागरातील महत्त्वपूर्ण स्थानावर जरब आणि प्रभाव उभारलेला आहे. मालदीव, सेशेल्स आणि मॉरिशस तसेच हिंदी महासागरातील अनेक बेटांवरील भारताचा प्रभाव ही वस्तुस्थिती चीनसाठी समस्या बनली आहे. भारत हा या देशांसाठी अनौपचारिक सुरक्षा देणाऱ्याची भूमिका बजावतो त्याचबरोबर गस्त घालायची साधने, हेलिकॉप्टर आणि लष्करी प्रशिक्षण प्रदान करतो. त्यामुळे चीनची मालदीवमधील काय रुची आहे हे समजून घेता येते बीजिंग आर्थिक प्रलोभनांच्या सामर्थ्याने माले येथे आपला फायदा साधण्यासाठी आणि भारताला काटशह देण्यासाठी प्रयत्न करत आहे.

उच्चस्तरीय दोन्ही देशांच्या मंत्र्यांचे दौरे हे नियमितपणे होत असतात तत्कालीन विदेश मंत्री सुषमा स्वराज यांनी नोव्हेंबर 2014 आणि ऑक्टोंबर 2015 मध्ये मालदीवचा दौरा केला होता. तसेच तत्कालीन आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी जुलै 2015 मध्ये स्वातंत्र्याच्या स्वर्णजयंती समारोहात पंतप्रधानांचे विशेष प्रतिनिधी मधून मालदीवचा दौरा केला होता. तत्कालीन पर्यटन सांस्कृतिक तसेच नागरी उड्डाण राज्यमंत्री डॉक्टर महेश शर्मा यांनी यु एन डब्ल्यूटीओ क्षेत्रीय मंत्रीस्त्रीय परिषदेत भाग घेण्यासाठी जून 2015 मध्ये मालदीवचा दौरा केला होता. नरेंद्र मोदींनी पंतप्रधान पंतप्रधान पदाची शपथ घेतल्यानंतर त्यांच्या प्रथम परराष्ट्र संबंधाबद्दल असा संदेश होता तो दक्षिण आशियाई देशांसोबत संबंध अधिक बळकट करणे. 26 मे 2014 मधील त्यांच्या पंतप्रधानपदाच्या शपथविधी त्यांनी सर्कच्या सर्व सदस्य राष्ट्रांच्या प्रमुखांना आमंत्रित केले होते. पुढे डिसेंबर 2018 च्या सुरुवातीला पंतप्रधान मोदी यांनी इब्राहिम मोहम्मद सोली यांच्या शपथविधीसाठी मालदीवला धावती भेट दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती इब्राहिम मोहम्मद सोली यांच्यात झालेल्या चर्चेनंतर प्रसिद्ध झालेल्या संयुक्त निवेदनात दोन गोष्टी स्पष्ट होतात एक म्हणजे हिंदी महासागरात शांतता आणि सुरक्षितता राखणे गरजेचे आहे. दुसरे म्हणजे या साठी भारत-मालदीव या दोन देशांनी एकमेकांच्या चिंता आणि आकांक्षांची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. सोली यांनी मोदी सोबतच्या झालेल्या बैठकीत गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधांच्या गरजा भागविण्यासाठी तसेच दुरच्या बेटांवर पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्था उभारण्यासाठी मदत मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली होती. मोदींच्या या भेटीला प्रतिसाद म्हणून भारत मालदीव संबंध सुधारण्यासाठी पुढील पाऊल म्हणून मालदीवचे नवे राष्ट्राध्यक्ष 17 डिसेंबर 2018 रोजी भारतात आले होते. तत्पूर्वी मालदीवचे काही मंत्री आणि अधिकारी यांनी भारताला भेट दिली. त्यात परराष्ट्रमंत्री अब्दुल्ला शहीद, वित्तमंत्री इब्राहिम आमीर, आर्थिक विकास मंत्री फय्याज इस्माईल, परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री अहमद खलील आणि परराष्ट्र सचिव अब्दुल याकुर मोहम्मद यांचा समावेश होता. भारत मालदीवमधील नव्या सुरुवातीची चिन्हे दिसू लागली आहेत. मालदीवच्या परराष्ट्रमंत्री यांच्या भेटीनंतर परराष्ट्र मंत्रालयांनी असे विधान केले आहे की, " मालदीव बरोबरच्या आपल्या संबंधांना भारत महत्त्व देतो आणि संबंध विश्वास, पारदर्शकता, परस्पर समज आणि संवेदनशीलतेने चिन्हांकित केले आहेत." परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांनी त्यांना प्रतिसाद म्हणून असे म्हटले होते की, " भारताच्या 'नेबरहूड फर्स्ट' या धोरणानुसार आम्ही सामाजिक-आर्थिक विकासात मालदीव सरकारला पूर्णपणे मदत करण्यासाठी तयार आहोत." मालदीवचे परराष्ट्र मंत्री अब्दुल्ला शहीद यांनी आपल्या सरकारची 'इंडिया फर्स्ट पॉलिसी' पुन्हा जाहीर केली आहे आणि भारत सरकारची नवे बंध गुंफन्याबद्दल इच्छा व्यक्त केली. याच बैठकांमध्ये मालदीव ने भारताकडे 'डोर्नियर' विमानाची मागणी केली असून भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने ते लवकरच दिले जाईल असे वचन दिले आहे. दोन्ही राष्ट्रांमधील या घडामोडी आज घडीला महत्त्वाच्या आहेत कारण माजी राष्ट्राध्यक्ष अब्दुल्ला यामीन यांच्या सरकारच्या काळात मालदीव चीन च्या दिशेने झुकला आहे असे दिसून येत होते. उदाहरणार्थ मालदीव सरकारने विकासकांना 99 वर्षाच्या कालावधीसाठी बेटे वापरण्यासाठी परवानगी देणारा नवीन कायदा सादर केला. त्यानंतर एका चीनी कंपनीने 40 लाख डॉलर्स भरून माले आणि त्यांच्या आंतरराष्ट्रीय विमानतळ जवळील फेयधु ,फियोलू या निर्वासित बेटांवर नियंत्रण मिळविले.

**द्विपक्षीय सहयोग:**

भारत हा मालदीवचा प्रमुख सहकारी देश आहे. आपत्कालीन परिस्थितीत भारताने नेहमी मालदीवची मदत केली आहे. 26 डिसेंबर 2004 ला मालदीवला सुनामीने तडाखा दिल्यानंतर भारत हा प्रथम देश होता ज्याने मधील मदतीचा हात दिला होता. सुनामी तसेच त्यांनी उद्भवलेल्या परिस्थितीमुळे जो आर्थिक संकट मालदीव पुढे उभा राहिला होता त्यात भारताने मालदीवला 10 करोड रुपयांची आर्थिक मदत केली होती. कौशल्य विकासासाठी व प्रशिक्षणासाठी मालदीव मध्ये भारतीय सरकारने अनेक संस्था स्थापन केले आहेत. त्यात इंदिरा गांधी स्मारक हॉस्पिटल, इंजीनियरिंग औद्योगिक संकुल व

पर्यटन अध्ययन संकुल यांचा समावेश आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिपच्या सुद्धा योजना आखल्या आहेत त्यात पुढील योजनांचा समावेश होतो,

- आई. सी. सी. आर. स्कॉलरशिप.
- सार्क चेअर स्कॉलरशिप.
- आई. टी. ई. सी. प्रशिक्षण व स्कॉलरशिप.
- कोलंबो योजना अंतर्गत तांत्रिक प्रशिक्षण सहाय्यता.
- चिकीत्सा स्कॉलरशिप.

मालदीव मधील अनेक राजनय यांनी भारतातील आय.एफ.एस. संस्थांमध्ये प्रशिक्षण प्राप्त केले आहे. भारत सरकारने मालदीवच्या शिक्षण क्षेत्रामध्ये व्यावसायिक प्रशिक्षणासाठी 5.3 दशलक्ष डॉलर्सची भरघोस गुंतवणूक तसेच मदत केली आहे. त्या योजनेअंतर्गत 27 महिन्यात पाच हजार शिक्षकांना तसेच युवकांना संगणकीय ज्ञानाचे प्रशिक्षण देण्यात आले आहेत.

**आर्थिक संबंध:**

भारत आणि मालदीव दरम्यान 1981 मध्ये व्यापारी करारांवर हस्ताक्षर झाले होते. सुरुवातीला व्यापार कमी होता पण हळूहळू हा व्यापार वाढीला लागला व तो आता 700 कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. भारताकडून मालदीवला पोल्ट्री उत्पादन, साखर, फळे व भाजीपाला, मसाले, तांदूळ, कापड, औषधी तसेच इंजिनिअरिंग व औद्योगिक साहित्य निर्यात केली जातात. 1981 मध्ये झालेल्या द्विपक्षीय कराराअंतर्गत भारत मालदीवला अत्यावश्यक असलेली खाद्यपदार्थ निर्यात करतो.

द्विपक्षीय व्यापार (दशलक्ष डॉलर्स मध्ये)

| वर्ष | भारतीय निर्यात | भारतीय आयात | एकूण |
|---|---|---|---|
| 2015 | 205 | 1.6 | 206.6 |
| 2017 | 208.1 | 1.9 | 210 |
| 2019 | 212.5 | 2.5 | 215 |
| 2021 | 585 | 5 | 590 |

भारतीय स्टेट बँक तेथील पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी तसेच समुद्री उत्पादनांना चालना देण्यासाठी आर्थिक सहायता करतो. भारतीय हॉटेल व्यवसायिक सुद्धा मोठ्या प्रमाणात मालदीव मध्ये पायाभूत सुविधा निर्मितीसाठी तिथे आर्थिक गुंतवणूक करत आहे.

**सांस्कृतिक संबंध:**

दोन्ही देशांमध्ये पूर्वीपासूनच सांस्कृतिक संबंध पाहायला मिळतो. व तो वृद्धिंगत होण्यासाठी दोन्ही देशांमध्ये प्रयत्न चालू आहेत. मालदीव मधील तीन ऐतिहासिक मस्जिदांच्या जिर्णोद्धारासाठी एन. आर. एल. सी. सी. पी. लखनऊ मधील भारतीय विशेषज्ञानद्वारे करण्यात आले. त्यात शुक्रवार मस्जिद माले, धारमवंता रासगेफानु मस्जिद माले व फेफुशी मस्जिद दक्षिण अरी अटोल यांचा समावेश आहे. मालदीव मध्ये हिंदी भाषिक चित्रपट, टीव्ही सिरीयल तसेच भारतीय संगीत अधिक लोकप्रिय आहेत. जुलै 2011 मध्ये स्थापित माले मधील भारतीय सांस्कृतिक केंद्र हे योग, शास्त्रीय संगीत व नृत्य यांचे नियमित अभ्यासक्रम चालवते.

**हिंदी महासागरातील चीनचा हस्तक्षेप:**

गेल्या काही वर्षांपासून भारतीय उपखंडातील चीनचा हस्तक्षेप वाढत आहे. पैशाच्या जोरावर भारताच्या शेजारील राष्ट्रांना विकासाचे व समृद्धीचे गाजर दाखवून भारताच्या विरोधात उभे करण्याचे कारस्थान चीनने केले आहे. चीनच्या या कृती मागचा उद्देश म्हणजे भारताचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील अस्तित्व संपविणे आणि आशिया खंडातील चीन चा स्पर्धक नष्ट करणे हे आहे. चीनचे मालदीवमधील महत्व एकाएकी कमी होणार नाही. कोणत्याही देशात विरोधी पक्ष सत्तेवर आल्यानंतर परराष्ट्र व आर्थिक धोरण एकदम बदल होत नाही. मित्र व्यापाराच्या दृष्टीने कायम ठेवली जातात. आर्थिक हितसंबंधांना बाधा येईल असे निर्णय घेतले जात नाहीत. मालदीव हा चीन ने दिलेल्या कर्जात पुरता बुडाला आहे ते कर्ज त्यांना फेडावे लागेल. आता आव्हान मालदीवमध्ये लोकशाही संस्कृती रुजवण्याची आहे. राष्ट्राध्यक्ष मोहम्मद

सोलि मध्यममार्गी व लोकशाही प्रेमी आहेत. अशा व्यक्तीकडून सामंजस्य व समतोल नेतृत्वाची अपेक्षा करता येते. मालदीव सोबत बिघडलेले संबंध प्रस्थापित करण्यासाठी झालेल्या झालेल्या सत्तांतराचा फायदा भारताने घेतला आहे. मालदीवमध्ये नवे सरकार आल्याने भारतामध्ये अशी आशा आहे की नवी दिल्ली आणि माले मिळून मागील सरकारने केलेल्या चुका दुरुस्त करण्याची सुरुवात करतील. मोदी आणि जयशंकर प्रसाद हे दोघेही तसेच भारतीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मालदीवला चीनच्या कर्जाच्या जाळयात अडकण्यापासून पासून वाचविण्यासाठी दोन देशांमधील भागीदारी वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण मदत करण्याचे वचन दिले आहे. तथापि इतर लहान शेजारी देशांबरोबर असलेल्या भारताच्या संबंध प्रमाणे हा देखील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. भारत हा अनेक प्रकल्पांमध्ये चीनशी स्पर्धा करत असून चीनच्या यशापयशावर भारतीय नितीचा निवाडा होणार आहे.अवाढव्य अर्थव्यवस्था, सक्षम लष्कर व मारलेल्या भूलथापा यांना बळी पडत दक्षिण आशिया हा हिंदी महासागर क्षेत्रातील अनेक छोट्या मोठ्या राष्ट्रांनी भारताचा हात सोडून चीनचे बोट पकडले आहेत. परंतु काही काळ सुखात गेल्यानंतर चीनने आपल्या डोक्यावर उभा केलेला कर्जाचा डोंगर आणि अंतर्गत राजकारणातील वाढता हस्तक्षेप यामुळे आपण केलेल्या चुकांची जाणीव या राष्ट्रांना झाली आणि ती पुन्हा एकदा भारताच्या बाजूने सामील होऊ लागली आहेत मालदीव हे त्यापैकी एक राष्ट्र आहे.

**निष्कर्श:**

नरेंद्र मोदींनी दुसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर आपल्या पहिल्या परदेश दौरा अंतर्गत मालदीवला भेट दिली. मालदीव सारख्या लहान देशाला भारताने इतके महत्त्व देण्याची खरेच गरज आहे का? मोदींनी मालदीवला भेट देऊन भारत छोट्या देशांनाही मोठ्या देशांत तितकेच महत्त्व देतो हा संदेश दिला. गेल्या काही वर्षात मालदिव आणि भारत संबंध बिघडले होते. कारण तिथे चीनच्या बाजूने अब्दुल्ला यामीन यांचे सरकार सत्तेवर होते. पुढे मालदीवच्या नागरिकांनीच चीनच्या तालावर नाचणाऱ्या अब्दुल्ला यामीन सरकारला अलविदा करत इब्राहिम सोली यांच्या हाती सत्ता सोपवली. नरेंद्र मोदींनी मालदीवला भेट देऊन सामरिक व आर्थिक दृष्ट्या भारताचे प्रतिस्पर्धी चीनची कोंडी केली आहे. या सरकारच्या काळात चीनने मालदीवचा ही यासाठी पुरेपूर वापर करून बंदरे, विमानतळ यांना आपल्या ताब्यात ठेवून मालदीवशी उत्तम संबंध राखून भारताच्या सागरी सीमे जवळ येण्याची प्रयत्न केले. मोदींनी मालदीवला भेट देऊन भारताच्या शेजारी राष्ट्रात चिनी कमी झाला चा संदेश दिला.

**संदर्भ:**

1) ब्रिगेडियर महाजन हेमंत (10 march 2018) - 'मालदीवमध्ये चीनच्या हालचालीवर नजर ठेवण्याची गरज'- marathisrushti.com.

2) राजगोपालन राजेश्वरी पिल्लई( 2020) - 'भारत आणि मालदीव संबंध नव्या वळणावर'- orfonline.org.

3) कोपरकर डॉ. रश्मीनि (2 January 2019)- 'मालदीवमधील राजकीय परिस्थिती आणि सुधारू पाहणारे भारत मालदीव संबंध'- aksharnama.com.

4) Moorthy N. Sathiya ( 8 August 2022 ) - 'भारत-मालदीव संबंध: सोलिह की हाल की भारत यात्रा.'

5) India Exports to Maldives 2022 data - tradingeconomics.com